**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,**

**१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**

दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी क्र- **dydepune@gmail.com** वेब साईट- **www.dydepune.com**


---

**जा.क्र.उमाशि-४०३/११ वी ऑनलाईन/२०१७/**

**दिनांक -** 27 JUL 2017

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व कनिष्ठ महाविद्यालये,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र,**

**विषयः-**इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन २०१७-१८ प्रवेशाबाबत

**संदर्भः-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६.**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**

इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शासन निर्णयानुसार सुरु आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे पहिल्या व दुस-या फेरी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेले आहेत व अशा विद्यार्थ्यांनी संपुर्ण फी भरुन प्रवेश निश्चित केलेला आहे. परंतु काही विद्यार्थी मिळालेला प्रवेश काही कारणास्तव ऑनलाईन प्रवेश रद्द करत आहेत. असे प्रवेश रद्द करतांना खाली सूचनांचे पालन करावे.

१) पालक / विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्याबाबतचा लेखी अर्ज रद्द करण्याच्या कारणासह (पॉलिटेक्नीक, आयटीआय/इतर कोर्स / परगावी शिक्षणासाठी इ.) स्वाक्षरीसह घेण्यात यावा.

२) प्रवेशाच्या सर्व ऑनलाईन लिंक सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांने दिलेल्या अर्जानुसार ऑनलाईन प्रवेश रद्द करावा. त्यांनतर प्रवेश ऑनलाईन रद्द केल्याची पावती (CGR-Computer Generated Recipt) विद्यार्थ्यास देण्यात यावी.

३) विद्यार्थ्यांनी जर संबधित महाविद्यालयातीलफी भरलेली असेल तर प्रवेश रद्द करतांना रु. २००/- (रु.दोनशे मात्र) शुल्क कमी करुन उर्वरित संपूर्ण फी विद्यार्थ्यांस परत करावी. तसेच इ. १० वी चा मूळ शाळा सोडल्याचा दाखला व मूळ गुणपत्रक विद्यार्थ्यांस त्याच वेळी देणेत यावे. त्याबाबतची पोहोच घेण्यात यावी.

४) या कार्यालयाच्या आदेशानंतर अथवा संपुर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टर मध्ये नोंद घ्यावी.

५) महाविद्यालयाच्या फी व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात येऊ नये. तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना कोणत्याही प्रकारचे साहित्य महाविद्यालयातून खरेदी करणेबाबत सक्ती करण्यात येऊ नये. (उदा-कॉलेज माहिती पुस्तिका, जरनल, प्रयोगशाळे संबधी साहित्य, गणवेश, शैक्षणिक साहित्य).

उपरोक्त १ ते ५ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, याबाबत या कार्यालयाकडे आपल्या महाविद्यालयाची तक्रारी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग,पुणे -१**

**प्रत माहितीसाठी**

**१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१**

**२) मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१**